**International Research Journal of Human Resource and Social Sciences**
**ISSN(O): (2349-4085) ISSN(P): (2394-4218)**
**Impact Factor 5.414 Volume 7, Issue 02, February 2020**
**Website**- www.aarf.asia, **Email** : editoraarf@gmail.com

# "मेळघाटातील आदिवासी मजूरांच्या हंगामी स्थलांतरणाची कारणमिमांसा एक समाजशास्त्रीय अध्ययन"

संदर्भ: मेळघाटपरिक्षेत्रातील चिखलदरा तालुका

संशोधनकर्ता
संदीप महादेवराव हाडोळे

मार्गदर्शक
डॉ. अरूणसिंह धों. चौहान
एम.ए., एम.फिल., पीएच.डी., सहयोगी प्राध्यापक
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती

**गोषवारा:**2011 च्या जनगणना अहवालानुसार चिखलदरा तालुक्यातील एकुन लोकसंख्या 1,18,815 आहे व या एकुन लोकसंख्येपैकी 4.3 टक्के लोक शहरात म्हणजे चिखलदरा या शहरात राहतात. तर 95.07 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. चिखलदरा या शहरी भागातील साक्षरता दर 91.09 आहे तर ग्रामीण भागातील फारच कमी म्हणजे 17.05 टक्के आहे. तसेच चिखलदरा या शहरातील स्त्री – पुरूष प्रमाण 849 तर ग्रामीण भागातील 962 आहे. चिखलदरा तालुक्यातील एकुन लोकसंख्यांपैकी लहान मुलांची (0–6 वयातील) संख्या 17040 म्हणजे 14 टक्के आहे. यापैकी 8620 पुरूष आणि 8420 स्त्रीया आहेत. 2011 च्या जनगणना अहवालानुसार चिखलदरा तालुक्यातील लहान मुलांमधील स्त्री – पुरूष प्रमाण 977 आहे आणि हे प्रमाण सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे. चिखलदरा तालुक्यातील संपूर्ण साक्षरता दर 6.09 आहे. यापैकी 12.06 पुरूष आणि 07.41 टक्केस्त्री साक्षरता दर आहे. संशोधनामध्ये सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो संशोधन पद्धतीचा वापर याकरिता प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. प्राथमिक माहिती संकलित करताना मेळघाटपरिक्षेत्रांमधून 200 उत्तरदात्यांची निवड करून त्यांच्या मार्फत माहिती संकलित करण्यात आलेली आहे. दुय्यम माहिती संकलित करताना विविध शोधलेख, पुस्तके व इतर साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**सुचक शब्द:**बहुसंख आदिवासीआदिवासी जमातींचाचिखलदरा

**प्रस्तावना:**2011 च्या जनगणना अहवालानुसार चिखलदरा तालुक्यातील एकुन लोकसंख्या 1,18,815 आहे व या एकुन लोकसंख्येपैकी 4.3 टक्के लोक शहरात म्हणजे चिखलदरा या शहरात राहतात. तर 95.07 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. चिखलदरा या शहरी भागातील साक्षरता दर 91.09 आहे तर ग्रामीण भागातील फारच कमी म्हणजे 17.05 टक्के आहे. तसेच चिखलदरा या शहरातील स्त्री – पुरूष प्रमाण 849 तर ग्रामीण भागातील 962 आहे. चिखलदरा तालुक्यातील एकुन लोकसंख्यांपैकी लहान मुलांची (0–6 वयातील) संख्या 17040 म्हणजे 14 टक्के आहे. यापैकी 8620 पुरूष आणि 8420 स्त्रीया आहेत. 2011 च्या जनगणना अहवालानुसार चिखलदरा तालुक्यातील लहान मुलांमधील स्त्री – पुरूष प्रमाण 977 आहे आणि हे प्रमाण सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे. चिखलदरा तालुक्यातील संपूर्ण साक्षरता दर 6.09 आहे. यापैकी 12.06 पुरूष आणि 07.41 टक्केस्त्री साक्षरता दर आहे. 2011 च्या जनगणना अहवालानुसार धारणी तालुक्यातील एकुन लोकसंख्या 1,84,665 आहे. एकुन लोकसंख्येतील 93898 पुरूष तर 90767 स्त्रीयांची लोकसंख्या आहे.

भारतात 461 आदिवासी जमातींचा उल्लेख अनुसूचित जमातीत केला आहे. 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या 85.77 लक्ष्य इतकी आहे. राष्ट्रपतीच्या अधिसुचनेनुसार राज्यातील आदिवासी क्षेत्र आणि आदिवासी जिल्हे नक्की करण्यात येतात. यात (The scheduled catse and scheduled tribes orders Amendment Act 2002 No- 106/2003)नुसार ही संख्या 45 झाली. त्यापैकी तिन जमाती ह्याळया आदिवासी जमाती म्हणुन घोषीत करण्यात आलेल्या आहेत. कातकरी, कोलाम आणि माडीया गोंड, या तिन आदिवासी जमाती अतिमागास किंवा प्रिमिटिव्ह ट्राईब मध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. राज्यातील बहुसंख आदिवासी ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव अहमद नगर, पूणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ वर्धा, नागपूर भंडारा, चंद्रपूर, चंद्रपूर, रायगड या सर्व जिल्हयामध्ये समाविष्ट आहेत. आदिवासी जमातीचा विचार करता त्यात भिल्ल, महादेव कोळी गोंड, वारली, कोकणा, कोलाम, कोरकू आंध मल्हार कोळी, धोंडीया, दुबळा, माडीया गोंड, परधान, पारधी हया जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो.

**पूर्व संशोधनाचा आढावा:**
**पाटीलप्रा. डि. जी. (2016)–**

अर्थशास्त्र विभागप्रमुख, जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदूरबार, **"नंदूरबार जिल्हयातील स्थलांतरीत आदिवासी मजूरांच्या समस्या"** या शोध निबंधामध्ये त्यांनी नंदूरबार जिल्हयातील आदिवासी मजूरांच्या हंगामी स्थलांतरणाच्या कारणांचा ऊहापोह केला आहे. प्रा. डि. जी. पाटील यांच्या मते, नंदूरबार जिल्हयात आदिवासी वसाहतींचे सहा तालुक्के आहेत. अक्कलकुवा, अक्राणी, धडगांव, शहादा, तळोदा, शहापूर या सहाही तालुक्यातील आदिवासी कुटूंबे मोठया प्रमाणावर स्थलांतर करतांना दिसून येत आहेत. साधारणतः आक्टोबर महीन्यापासून आदिवासींची स्थलांतरासाठीची लगबग सुरू होते. आक्टोंबर ते मे या कालावधीत आदिवासी मजूर हंगामावर गुजरात राज्यात स्थलांतर करतात.

नंदूरबार जिल्हयातील अनेक आदिवासी कुटूंबे कायम स्वरूपी जिल्हयातून स्थलांतरीत होवून नविन इमारत बांधकाम व्यवसायात मजूरी करतात. काही कुटूंबे शेती व्यवसायात मजूरी करीत असतात.

**संशोधन समस्या:**मेळघाटपरिक्षेत्रामधील चिखलदरा तालुका मध्ये मोठ्या संख्येने आदिवासी लोक राहतात. परंतु तिथे त्यांना रोजगाराची उपलब्धता वर्षभर नसते त्यामुळे हंगामाच्या काळात इतर ठिकाणी त्यांना स्थानांतरित होऊन रोजगार प्राप्त करून पैसे कमवावे लागतात ज्या माध्यमातून परत आल्यावर त्यांचा उदरनिर्वाह होऊ शकेल या संदर्भात सदर शोधलेखाच्या माध्यमातून सदर कारणांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश:**

- मेळघाट परिक्षेत्रातील चिखलदरा तालुक्यामधील उत्तरदात्यांमार्फत स्थलांतराची कारणे शोधणे.
- चिखलदरा तालुक्यातील निवडक उत्तरदात्यांमार्फत समस्येची माहिती घेणे.
- हंगामी मजूर म्हणून स्थलांतरित होत असताना त्यांच्या कोणत्या स्वरूपाच्या अडचणी आहे याचे अध्ययन करणे

**संशोधनाची गृहीतकृत्य:**

- मेळघाट परिक्षेत्रातील चिखलदरा तालुक्यामधील स्थलांतरित मजूर अडाणी असल्यामुळे त्यांचे कामाच्या ठिकाणी आर्थिक शोषण होत नाही.
- मेळघाट परिक्षेत्रातील चिखलदरा तालुक्यामधील स्थानांतरित मजूर अडाणी असल्यामुळे त्यांचे कामाच्या ठिकाणी आर्थिक शोषण होते
- हंगामी मजूर म्हणून काम करणारे मूळनिवासी यांना स्थानिक स्तरावर उपलब्ध रोजगार चा मोबदला अतिशय अल्प दिल्या जात नाही.
- हंगामी मजूर म्हणून काम करणारे मूळ निवासी यांना स्थानिक स्तरावर उपलब्ध रोजगारात चा मोबदला अतिशय अल्प दिल्या जातो.

**संशोधन पद्धती:**

संशोधनामध्ये सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो संशोधन पद्धतीचा वापर याकरिता प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. प्राथमिक माहिती संकलित करताना मेळघाटपरिक्षेत्रांमधून 200 उत्तरदात्यांची निवड करून त्यांच्या मार्फत माहिती संकलित करण्यात आलेली आहे. दुय्यम माहिती संकलित करताना विविध शोधलेख, पुस्तके व इतर साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा:**

- संशोधनाचे परिक्षेत्र हे मेळघाट असून चिखलदरा तालुक्यामधून प्राथमिक माहिती संकलित करण्यात आलेली आहे.
- संशोधनातून प्राप्त होणारे निष्कर्ष हे केवळ उपलब्ध माहितीच्या आधारे मांडण्यात आलेले आहे.


**माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण:**

हंगामाच्या काळात रोजगार उपलब्ध नसल्यामुळे आपण कामाकरिता स्थानांतरित होता काय ?

सारणी क्रमांक 1

| अनुक्रमांक | कामाकरिता मजुरांचे स्थलांतर | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 200 | 100 |
| 2 | नाही | 0 | 0 |
| एकूण | | 200 | 100 |
| संदर्भ:प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 1




वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, हंगामाच्या काळात स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध नसल्यामुळे रोजगार मिळवण्याकरिता स्थानांतरित होणाऱ्या मजुरांची मते प्राप्त केल्या गेली ज्यामध्ये सर्वाधिक 200(100) उत्तर दात्यांनी आपली सहमती दर्शविली.


© Association of Academic Researchers and Faculties (AARF)

स्थानिक स्तरावर मिळणारा रोजगार चा दर हा अतिशय अल्प असतो काय ?

सारणी क्रमांक 2

| अनुक्रमांक | दर हा अतिशय अल्प असतो | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 178 | 89 |
| 2 | नाही | 22 | 11 |
| एकूण | | 200 | 100 |
| संदर्भ:प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 2





वरील सारणीवालेखावरून असे दिसून येते की, स्थानिक स्तरावर मिळणारा रोजगाराचा दर हा अतिशय अल्प असण्यासंदर्भात प्राप्त मतांमध्ये सर्वाधिक 178(89) उत्तर दात्यांनी आपली सहमती दर्शविली. यावरून असे सिद्ध होते की, स्थानिक स्तरावर रोजगाराचा दर अल्प असल्यामुळे त्यांना इतर ठिकाणी स्थलांतरित होऊन रोजगार व पैसा मिळवावा लागतो.

हंगामाच्या काळात चिखलदरा तालुक्यातील मजूर हे अडाणी असल्यामुळे आपल्या आर्थिक शोषण होते काय ?

सारणी क्रमांक 3

| अनुक्रमांक | अडाणी असल्यामुळे आपल्या आर्थिक शोषण | उत्तरदात्यांची मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 158 | 79 |
| 2 | नाही | 42 | 21 |
| एकूण | | 200 | 100 |
| संदर्भ:प्राथमिक माहितीच्या आधारे | | | |

आलेख क्रमांक 3




हंगामाच्या काळात चिखलदरा तालुक्यातील मजूर हे अडाणी असल्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होण्यासंदर्भात प्राप्त सर्वाधिक मतांमध्ये 158(79) उत्तर दात्यांनी आपली सहमती दर्शविली. यावरून हे सिद्ध होते की शैक्षणिक अभाव असल्यामुळे ठेकेदारामार्फत त्यांचेआर्थिक शोषण केले जाते.

**निष्कर्ष:**मेळघाट परिक्षेत्रातील चिखलदरा तालुका शोधलेखाकरिता निवडण्यात आलेला आहे. संशोधनाचे परिक्षेत्र जंगल व्याप्त आहे. आदिवासी समाज प्राचीन काळापासून जंगलामध्ये राहून शिकार करून कंदमुळे गोळा करून राहत असे परंतु ज्या पद्धतीने शहराचे प्रमाण वाढले त्याप्रमाणे त्यांना रोजगारा करिता शहरांकडे स्थानांतरित व्हावे लागले त्यामागील मुख्य कारण म्हणजे अशिक्षित अडाणीपणा व तसेच त्यांच्या याचा फायदा घेऊन इतर वर्ग आपल्या कमी पैशांमध्ये अधिक कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात. ज्याचा परिणाम असा होतो की त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होते तसेच स्थानिक स्तरावर उपलब्ध होणारा रोजगार चे दर अल्प असल्यामुळे त्यांना आर्थिक दृष्ट्या असंख्य

**© Association of Academic Researchers and Faculties (AARF)**

अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच कामाच्या ठिकाणी त्यांच्या वेगवेगळ्या पद्धतीने त्यांचे शोषण केले जाते परंतु इतर पर्याय उपलब्ध नसल्यामुळे ते त्याचा भाग बनवून जातात.सदर शोध लेखांमध्ये मांडण्यात आलेले गृहीत कृत्य यांची पडताळणी करण्याकरिता सारणीच्या आधारे गृहीत कृत्य सिद्ध करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये जो अल्टरनेटिव्ह हायपोथिसिस घेतलेला आहे तो सिलेक्ट होतो.

## References


1) The scheduled catse and scheduled tribes orders Amendment Act 2002 No-106/2003
2) पाटीलप्रा. डि. जी. – अर्थशास्त्र विभागप्रमुख, जी. टी. पाटील महाविद्यालय, नंदूरबार, "नंदूरबार जिल्हयातील स्थलांतरीत आदिवासी मजूरांच्या समस्या" व्हालूम – 5, 11 ऑगस्ट 2016)
3) पालवे व्ही. एस. – अ स्टडी ऑफ सोशिओ इकॉनॉमिक ॲस्पेक्टस ऑफ सिझनल मायग्रेटरी ॲग्रीकल्चरल लेबर वर्कींग इन शुगर फॅक्टरिज विथ स्पशल रेफरन्स टु पाथर्डी तालुका,जिल्हा अहमदनगर, पिएच. डी प्रबंध अप्रकाशित, पूणे युनिव्हरसिटी 1991
4) शिंदे एच. आर. – एम्प्लॉयमेंट इनकम एक्सपेंडीचर पॅटर्नस ऑफ द सिजनल मायग्रेटरी, ॲग्रीकल्चरल लेबर वर्कींग इन शुगर फॅक्टरी अहमदनगर डिस्ट्रिक्ट प्रबंध, अप्रकाशीत महात्मा फुले कृषी विद्यापिठ राहुरी 1992